**<u>नियमित दिवाणी दावा क्र.३१९/२०१६</u>**
**<u>श्री. प्रभु नरसिंघाणी विरुध्द भगवानदास नरसिंनी तर्फे वारस</u>**
**<u>निशाणी क्र.६५ वरुन</u>**

**वादीतर्फे साक्षीदार क्र.४ चा सरतपास वादीचे विधिज्ञ श्रीमती सारीका परदेशी यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

. माझे पुराव्याचे शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.

सरतपास संपला.

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.एस. भोजवानी यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

मला मराठी वाचता येत नाही हिंदी वाचता येते.

वादीच्या विधिज्ञांनी त्यांच्या साक्षीदाराचा उलटतपास सुरु असताना पहिले वाक्य न्यायालय लिहित असताना हस्पक्षेप करत साक्षीदाराचे तिसरे वाक्य प्रथम घ्यावे म्हणून जोरात आवाजात न्यायालयासमक्ष सबमिशन केले. तसेच वादीच्या विधिज्ञांनी जोरात आवाजात मी या प्रकरणामध्ये पूर्वीच्या साक्षीदारांची साक्ष कसे घेतले या संदर्भात अर्ज देते असे म्हणून परत जोरात बोलल्या. तसेच वादीच्या विधिज्ञांनी न्यायालयास मी रितसर न्यायालयासमक्ष अर्ज देते म्हणून या वेळी मात्र नम्रतापूर्वक विनंती केली. (वादी यांच्या विधिज्ञांची वर्तवुणक पाहता त्यांना प्रकरणामध्ये उलटपतासा दरम्यान साक्षीदाराच्या उलटतपासात वारंवार हस्तक्षेप करुन प्रकरण लांबवण्याचा प्रयत्न करत आहे.) वादीचे विधिज्ञ परत परत न्यायालयास साक्षीदाराने उलटतपासा दरम्यान तिला जबाब तिच्या मुलाने वाचुन दाखविला ही लाईन पहिल्यांदा घ्यावी म्हणून गोंधळ घालत आहे. उलटतपास सुरु झाल्यानंतर पहिले वाक्य नमुद केले त्याचवेळी वादीचे विधिज्ञांनी साक्षीदाराने उलटतपासा दरम्यान सांगितलेली तिसरी लाईन अगोदर घ्यावी म्हणून परत बोलणे सुरु केले. न्यायालय त्यांना सांगत आहे साक्षीदाराने त्यांना पहिले मराठी वाचता येत नाही असे सांगितले असल्यासमुळे प्रथम वाक्य त्या संदर्भात घेण्यात आलेले आहे. प्रतिवादीच्या विधिज्ञांनी पहिला प्रश्न मराठी वाचता येते का, अशी विचारणा केली व त्यानंतर दुसरा प्रश्न शपथपत्रातील मजकुरा संदर्भात विचारला त्यावेळी देखील त्यांनी मराठी येत नाही व त्यानंतर मला मुलाने शपथपत्र वाचुन

दाखवले असे सांगितले. (**न्यायालय साक्षीदाराच्या पहिल्या वाक्यापासुन उलटतपासा दरम्यान सांगत असलेले वाक्य नमुद करत असतानाच वादीच्या विधिज्ञांनी उठुन गोंधळ घालण्यास सुरुवात केली.** वादीच्या विधिज्ञांना न्यायालयाने सांगितले की, साक्षीदाराने प्रथम वाक्य सांगितले ते प्रथम घेण्यात येईल असे सांगितले. तरी देखील वादीचे विधिज्ञांनी साक्षीदाराने सांगितलेले म्हणजेच मुलाने शपथपत्र वाचुन दाखविले हा मजकुर अगोदर नमुद करावा म्हणत त्यांच्याच वागणुकीवर ठाम आहेत. वादीच्या विधिज्ञज्ञंनी त्यांना सदरचे प्रकरण या न्यायालयात चालवायचे नाही त्यामुळे त्या ट्रान्सफर पिटीशन दाखल करणार असे म्हणत न्यायालयाबाहेर निघुन गेल्या.

सरतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृत,

16.02.2026.

(एस.एस.चव्हाण)
सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर ,
पिंपरी, जि. पुणे

पिंपरी, पुणे
दिनांक :-१६/०२/२०२६